वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था
व्हीआयपी रोड, धरमपेठ, नागपूर ४४० ०१०
E Mail -- vanamati.cptp@gmail.com
Phone- 0712 2555999, 2541944

क्रं : वनामती/आस्था/सीपीटीपी/नामिकासूची/2022/ 907 दिनांक 16 /03/2022

# जाहिरात

( वनामती अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेसाठी नामिकासूची करणेबाबत)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उत्तीर्ण होणा–या वर्ग 2 परिविक्षाधिन अधिका–यांसाठी एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत दोन वर्षाच्या प्रशिक्षण कालावधीत शासनाचे प्रशासकीय कामकाजास पूरक ठरेल असा दोन वर्ष कालावधीचा Master of Arts in Development Admisistration – M.A. (D. Adm) with Specialization (विशेषीकरणासह) हा मुंबई विद्यापीठाचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणेसाठी वनामती नागपूर या संस्थेस प्राधिकृत करण्यात आलेले आहे. वनामती संस्थेतील सीपीटीपी अंतर्गत अभ्यासक्रम तयार करणे, विषय निहाय तासिका घेणे, प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिका तपासणे, मॉडरेशन, गुणपत्रक निकालपत्रक तयार करणे, प्रशिक्षणार्थ्याच्या Dessertation & Synopsis कामात मार्गदर्शन करणे व इतर अनुषंगीक कामे यासाठी खाली नमूद केलेल्या संवर्गातील प्रशिक्षण कामकाजाविषयक अनुभव असलेल्या महाराष्ट्र शासनाकडील वर्ग–1/वर्ग–2 सेवानिवृत्त अधिकारी, प्राध्यापक/सहा. प्राध्यापक इ. कडून नामिकासूचि (Empanelment) तयार करणेस्तव अर्ज मागविण्यात येत आहे.

सामान्य प्रशासन विभाग मुंबई शासन निर्णय क्रं टिआरएन–1117/प्र.क्र.66/सीपीटीपी, दिनांक 20 मे 2021 नुसार एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये गट ब मधील खालील संवर्गाचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यासाठी सेवानिवृत्त अधिका–यांची विवक्षित कामासाठी नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | प्रशासकीय विभाग | संवर्ग | आवश्यक पदे |
|---|---|---|---|
| 1 | महसूल व वन विभाग | 1. नायब तहसीलदार | 1 पद |
| 2 | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | 1. उपशिक्षणाधिकारी | 1 पद |
| 2 | आदीवासी विकास विभाग<br>नगर विकास विभाग | 1. प्रकल्प अधिकारी<br>2. मुख्याधिकारी, नगर परिषद | 1 पद |

2. एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रमामधील उपरोक्त नमूद सर्व संवर्गासाठी 8 आठवडयाचे पायाभूत प्रशिक्षण (सेमिस्टर 1) मध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे चार विषयावर प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण द्यावयाचे आहे.

२९५

1 कायदा (Law)
2 व्यवस्थापन व वर्तणूक विज्ञान (Management & Behavioral Science)
3 लोक प्रशासन (Public Administration)
4 कार्यालयीन कार्यपध्दती व वित्तीय प्रबंधन (Office procedure & Financial Management)

3. तसेच उपरोक्त नमूद संवर्गाचे संबधीत विभागाच्या मान्यतेने आठ आठवडयाचे तांत्रिक प्रशिक्षण वनामती येथे आयोजित करण्यात येते. सदर तांत्रिक प्रशिक्षणादरम्याने संबधीत संवर्गाच्या अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण वर्ग व प्रात्यक्षिक आयोजित करण्यात येतात. एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत नियोजन व नियंत्रण. वनामती येथे करण्यात येते.

4. उपरोक्त नमूद 2 व 3 मध्ये नमूद केलेले प्रशिक्षण पार पाडण्याकरिता या नामिकासूचितील अधिका-यांमार्फत खालीलप्रमाणे कामे त्यांच्याकडे सोपविण्यात येतील.

- प्रशिक्षण कार्यक्रमानुसार प्रशिक्षणाचे वेळापत्रक निश्चित करणे
- प्रशिक्षणाचे वाचन साहीत्य तयार करणे
- प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षण वर्गाचे नियंत्रण करणे
- प्रशिक्षणादरम्यान आयोजित करावयाच्या बाहयस्थ/आमंत्रिक व्याख्यात्यांचे पॅनल तयार करून त्यांना वेळोवेळी आवश्यकतेनुसार व्याख्यानासाठी आमंत्रित करणे
- परिक्षेसंदर्भात प्रश्नप्रत्रिका तयार करणे, उत्तर पत्रिकांची तपासणी करणेबाबत व्यवस्था करणे
- प्रशिक्षणार्थ्यांच्या Dessertation & Synopsis कामात मार्गदर्शन करणे.
- क्षेत्रिय स्तरावरील प्रशिक्षणादरम्यान येणा-या समस्या सोडविणे व प्रशिक्षण नियमित होते की नाही ते पाहणे.
- प्रशिक्षणासंबधी यशदा पुणे तसेच मंत्रालयीन स्तरावर होणा-या बैठकीस उपस्थित राहणे व वृत्तांत अहवाल मा. संचालक यांचेकडे सादर करणे
- मा. संचालक/सत्र संचालक यांनी प्रशिक्षण कार्यक्रम तसेच व्यवस्थापना संदर्भात वेळोवेळी दिलेल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करणे

5. एम्पॅनेल मध्ये नावे समाविष्ट असलेल्या फॅकल्टी पैकी संस्थेच्या निकडीनुसार आवश्यक असलेल्या फॅकल्टीस प्रथम 3 महिन्यासाठी नियुक्ती देण्यात येईल. आवश्यकतेनुसार नियुक्ती कालावधीत वाढ करण्यात येईल

6. या जाहिरातीव्दारे करावयाची नामिकासूची शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रं. संकीर्ण- 2715/प्र.क. 100/13, दिनांक 17 डिसेंबर 2016 मधील तरतूदीनुसार करण्यात येईल तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या अधिका-यांना शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे व वनामती नियामक मंडळाने ठरविलेल्या रू 45,000/- प्रतीमाह च्या मर्यादेपर्यंत पारिश्रमिक देण्यात येईल. कामाचे मुख्यालय नागपूर राहील.

नामिकासूचीत समाविष्ट झाल्यामुळे सेवानिवृत्त अधिका-यांस काम मिळेल, याची कोणतीही हमी देण्यात येणार नाही. प्रशिक्षण कालावधी व संवर्गानुसार प्रशिक्षण कामाची गरज विचारात घेउन आवश्यकते नुसार विशिष्ट कालावधीकरिता नियुक्ती देउन त्याप्रमाणे पारिश्रमिक देण्यात येईल. अधिका-यांचा अनुभव व त्यांच्या संवर्गानुसार विषयाबाबतचा अभ्यास याचा विचार करून वरील शासन निर्णयानुसार नियुक्तीबाबत कार्यवाही वेळोवेळी करण्यात येईल.

अधिक माहितीसाठी www.vanamati.gov.in या संकेतस्थळावर तसेच कार्यालयाचे सूचनाफलकावर देण्यात आलेल्या अटी व शर्तीचे अवलोकन करावे.

इच्छुक सेवानिवृत्त अधिका-यांनी 28-03-2022 .............. पूर्वी आपले अर्ज खालील पत्त्यावर सादर करावेत.

पत्रव्यवहाराचा पत्ता -

संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था
व्हीआयपी रोड, धरमपेठ, नागपूर 440 010
दूरध्वनी - 0712 - 2555999
ई मेल - cptp@vanamati.gov.in/ vanamati.cptp@gmail.com

Director
Vasantrao Naik State Agriculture
Management Training Institute M.S
Nagpur (VANAMATI)

## नामिकासूचीतील सेवानिवृत अधिका-यांसाठी अटी व शर्ती

1. एम्पॅनलमेंट (Empanelment) तीन वर्षाच्या कालावधीकरीता करण्यात येईल व त्याबाबत वार्षिक आढावा घेउन विषय किंवा पॅनेल च्या सदस्यांमध्ये वाढ किंवा घट करण्यात येईल.

2. विवक्षित कामाचे स्वरूप आणि व्याप्ती विचारात घेउन ते काम पुर्ण करण्याचा कालावधी निश्चित करून सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एक वर्षासाठी देण्यात येईल व आवश्यकता असल्यास नियुक्तीचे वाढीव कालावधीकरिता नुतनीकरण करण्यात येईल परंतु असा एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

3. करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या अधिका-यांना शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे व वनामती नियामक मंडळाने ठरविलेल्या रु 45,000/- प्रतीमाह च्या मर्यादिपर्यंत पारिश्रमिक देण्यात येईल.

4. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

5. करार पध्दतीने नियुक्ती करतांना कमाल वयोमर्यादा ही 65 वर्षापेक्षा अधिक नसेल.

6. असा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असलेबाबत तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असल्याबाबत खातरजमा करण्यात येईल.

7. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात / हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांनाा शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती, करार पध्दतीवरील उमेदवारांकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा समावेश करून सदर अटी व शर्ती मान्य असल्याचा उल्लेख करण्यात येईल.

8. अशा अधिका-याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसल्याबाबत खातरजमा करण्यात येईल.

9. नियुक्ती प्राधिकारी याना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या करार पध्दतीवर सेवा समाप्त करण्याचा अधिकार राहील.

10. असा अधिकारी यांनी Conflict of Interest जाहीर करणे आवश्यक राहील

11. अशा अधिका-यांना/कर्मचा-यांना वाहन अनुज्ञेय / उपलब्ध असणार नाही. तसेच अशा अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्ती वेळच्या वेतनमानास अनुसरून प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

12. अशा करार पध्दतीवरील अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

13. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेले अधिकारी /कर्मचारी संचालक, वनामती यांचे नियंत्रणाखाली कार्यरत असतील.

14. नियुक्त करण्यात आलेले अधिकारी /कर्मचारी यांना त्यांचेवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेउन कामाचे मूल्यमापन करतील.

15. अशा अधिकारी/कर्मचारी यांनी तयार केलेले अहवाल/प्रस्ताव संचालकांच्या मान्यतेअंती शासनास सादर करता येतील.

16. करार पध्दतीने घेण्यात आलेल्या अधिकारी /कर्मचारी यांना सोपविण्यात येणा-या कामाचे स्वरुप संचालक, वनामती यांचे अंतिम निर्णयाने ठरेल.

17. करार पध्दतीने घेण्यात येणा-या अधिकारी/कर्मचारी यांची बैठक व्यवस्था उपलब्ध असलेल्या जागेनुसार करण्यात येईल.

18. अशा अधिकारी/कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं. संकीर्ण-2715/ प्र.क्र.100/13, दिनांक 17 डिसेंबर 2016 मधील अटी व शर्ती लागू राहतील.